महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २९ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# निवडणुकांना स्थगिती नाही

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सुरू असलेल्या आरक्षणाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणारच, असं न्यायालयानं सांगितलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २१ जानेवारीला होणार आहे. म्हणजे, निवडणुका झाल्यानंतर न्यायालय यावर अंतिम निर्णय देईल. न्यायालयानं निवडणुकांना परवानगी दिली असली तरी एक मोठी अट घातली आहे. पुढील निवडणुकांमध्ये कोणत्याही परिस्थितीत आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होता कामा नये. लोकशाही प्रक्रिया सुरू राहणे महत्त्वाचे आहे, त्यामुळे निवडणुका थांबवल्या जाणार नाहीत. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका अधिसूचित वेळापत्रकानुसार घेण्यास सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. याचाच अर्थ कोणत्याही



### पुढील सुनावणी 21 जानेवारीला

निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाहीय. ही प्रक्रिया सुरू राहील. मात्र ज्या ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक ओलांडली गेली आहे, त्यांचा अंतिम निकाल या प्रकरणाच्या निकालावर अवलंबून असेल. याचाच अर्थ या ५७ संस्थांमध्ये निवडून आलेले उमेदवार तेव्हाच पद ग्रहण करू शकतील, जेव्हा सर्वोच्च न्यायालय आरक्षण वैध ठरवेल, असंही सर्वोच्च न्यायालयानं नमूद केलंय.

### प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर

ओबीसी आरक्षणाचे हे महत्त्वपूर्ण प्रकरण आता तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर दुसऱ्या आठवड्यात 21 जानेवारी 2026 रोजी पाठवले जाईल. ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी तोपर्यंत निवडणुका थांबवण्याची मागणी केली, परंतु न्यायालयाने ती फेटाळून लावली.

### निकाल अंतिम निकालाच्या अधीन

**न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने सादर नोटनुसार, राज्यातील केवळ 40 नगर परिषदा आणि 17 नगर पंचायतींमध्ये आरक्षण 50 टक्क्यांपेक्षा जास्त झाले आहे. सरन्यायाधीशांनी म्हटलं की, "सध्या वेळापत्रकानुसार नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुका होऊ शकतात. परंतु, ज्या 40 नगर परिषदा आणि 17 नगर पंचायतींमध्ये आरक्षण 50 टक्क्यांपेक्षा जास्त आहे, त्या निवडणुकांचे निकाल या प्रकरणाच्या अंतिम निकालावर अवलंबून राहतील."**



# जीवनदीप महाविद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेली येथे दिनांक 28/11/2025 शुक्रवार रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना काहीतरी करून दाखवण्याची संधी मिळावी यासाठी आपल्या महाविद्यालयात वेगवेगळे उपक्रम राबवले जातात, त्याचाच एक भाग म्हणून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. मानसिक आरोग्याचे महत्व, हवामान बदलाचे परिणाम, AI समोरील आव्हाने व विकास,, बनावट बातम्यांचा प्रसार या विषयांवर विद्यार्थ्यांनी त्यांचे मत व्यक्त करून माहिती दिली.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सभाधिटपना निर्माण व्हावा हा उद्देश समोर ठेवून आजच्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे सूत्रसंचालन अकरावी वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी कु. उन्नती संदेश सुर्वे हिने केले. स्पर्धेचे परीक्षण सौ. भोंडीवले मॅडम व श्री. चव्हाण सर यांनी केले. सदर स्पर्धेसाठी कनिष्ठ

**वक्तृत्व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:**

**प्रथम क्रमांक :**
**जीवा दीपक जांभळे**
**(11वी विज्ञान)**

**द्वितीय क्रमांक :**
**भक्ती नरेश रोहणे**
**(12वी विज्ञान)**

**2) हर्षदा संजय केणे**
**तृतीय क्रमांक :**
**राजनंदिनी प्रवीण आडे**
**(12वी विज्ञान)**

**उत्तेजनार्थ**
**प्रथम क्रमांक :**
**तृप्ती महेंद्र माळी**
**(11वी वाणिज्य)**

**द्वितीय क्रमांक:**
**उन्नती संदेश सुर्वे**
**(11वी वाणिज्य)**

महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. रोहणे सर व सर्व शिक्षक उपस्थित होते.या स्पर्धेचे आयोजन सौ. महाले मॅडम यांनी केले.

## लक्षवेधी

### मनसेचे डोंबिवली जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर यांचा राजीनामा

#### भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक आणि मनसेचे कल्याण जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर यांनी शुक्रवारी मनसेच्या पक्ष सदस्यत्वाचा आणि जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना दिला. या राजीनाम्यामुळे प्रकाश भोईर यांचा भाजप प्रवेश निश्चित मानला जात आहे.मागील काही दिवसांपासून मनसेचे काही नगरसेवक, पदाधिकारी भाजपच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात होती. प्रकाश भोईर यांच्या देवीचापाडा येथील सत्यवान चौक ते स्मशानभूमी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ काही दिवसांपूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला होता. मनसेच्या प्रभागात भाजप आमदाराने निधी उपलब्ध करून दिल्याने आणि मागील पाच वर्षापासून रखडलेले रस्ते काम मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. गेल्या पंधरा दिवसापासून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डोंबिवली आयोजित विकास कामांच्या शुभारंभ कार्यक्रमात मनसेचे माजी नगरसेवक प्रकाश भोईर, पत्नी सरोज भोईर हे व्यासपीठावर दिसत होते.

### वाड्यात वन विभागाची कारवाई

#### खैराने भरलेला ट्रक जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा, ता. २८** गुजरात येथून चिपळूणकडे बेकायदा वाहतूक होत असलेला खैर या लाकडाने भरलेला ट्रक जप्त करण्यात आला. हा ट्रक मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चारोटी मनोरच्या हद्दीत आढळून आला. ट्रकमध्ये १५ टनांपेक्षा अधिक सोलीव खैर लाकूड जप्त करण्यात आले असून वाहनचालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना गुरुवारी (ता. २७) रात्रीच्या सुमारास घडली. वाडा दक्षता पथकाने केलेल्या या कारवाईमुळे खैर तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

### मंगळवारी डोंबिवलीचा पाणीपुरवठा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली उदंचन केंद्रामार्फत उल्हास नदीतून पाणी उचलून १५० द.ल.लि. नेतिवली जलशुध्दीकरण केंद्राद्वारे पाणी शुद्ध करून डोंबिवली पूर्व व पश्चिम विभागास पाणी पुरवठा केला जातो. या उदंचन केंद्रातील व जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत व यांत्रिकी उपकरणाची दुरूस्तीची कामे करणे व डोंबिवली विभागाच्या वितरण व्यवस्थेतील दुरूस्तीची कामे करणे आवश्यक आहे. हि कामे करण्याकरिता मंगळवार दि.०२/१२/२०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ९ तास (शट डाऊन) नेतिवली जलशुध्दीकरण केंद्रामधून डोंबिवली पूर्व व पश्चिम विभागास होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी या परिसरातील नागरिकांनी पाण्याचा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

### अंबादास दानवे यांची मुदत संपली

### शिरसाट यांना 'अजिंक्यतारा' बंगला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आणि शिवसेना (ठाकरे) नेते अंबादास दानवे यांची मुदत २९ ऑगस्ट रोजी संपुष्टात आली. त्यामुळे त्यांना देण्यात आलेला अजिंक्यतारा शासकीय बंगला आता मंत्री संजय शिरसाट यांना देण्यात आला आहे. दानवे यांनी मागील अडीच वर्षे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते म्हणून कामकाज केले. परंतु २९ ऑगस्टला त्यांची मुदत संपली. मुदत संपल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने हा बंगला रिकामा करण्यास सांगितले होते. त्यानंतर दानवे यांनी 'अजिंक्यतारा' बंगला रिकामा करून दिला. गेल्या काही दिवसांपासून रिकामा असलेला बंगला आपल्याला मिळावा, अशी विनंती संजय शिरसाट यांनी केली होती. त्यानुसार शासनाने मंत्रालयाशेजारील अजिंक्यतारा बंगला शिरसाट यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिरसाट यांना यापूर्वी अंबर हे निवासस्थान देण्यात आले होते. मात्र, ते निवासस्थान रिकामी करण्याचे निर्देश अवर सचिव संगीता शिंदे यांनी दिले आहेत. या संदर्भातील आदेशाची प्रत राज्यपाल सचिवालय, मुख्यमंत्री कार्यालय व विधान परिषद सचिवालय यांना देण्यात आली आहे.

# डोंबिवली : सावळाराम महाराज क्रीडा संकूलाच्या भूखंडावर अत्याधुनिक क्रीडानगरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण - कल्याण डोंबिवली पालिकेच्या डोंबिवलीतील सावळाराम महाराज या २० एकरच्या भूखंडावर अत्याधुनिक क्रीडानगरी उभी राहणार आहे. या क्रीडानगरीत ठाणे जिल्ह्यातील खेळाडुंना सर्व प्रकारच्या खेळांच्या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. एमआयडीसीकडून या नव्या क्रीडानगरीची उभारणी केली जाणार आहे. या कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी एकूण १८१ कोटीची निधीची तरतूद आहे. अलीकडेच या कामासाठी शासनाकडून उपलब्ध झाला आहे. सावळाराम महाराज क्रीडासंकुलातील अत्याधुनिक क्रीडानगरीसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे गेल्या तीन वर्षापासून प्रयत्नशील होते. ठाणे जिल्ह्यातील खेळाडुंना एका छताखाली अत्याधुनिक खेळ प्रकारांच्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत यासाठी सावळाराम क्रीडासंकुलात या सुविधा उपलब्ध व्हाव्या म्हणून खासदार डॉ. शिंदे शासनस्तरावर प्रयत्नशील होते. खासदार डॉ. शिंदे यांच्या प्रयत्नातून या कामासाठी पहिल्या टप्प्यात ५५ कोटीचा निधी उपलब्ध झाल्याने या कामांना एमआयडीसीकडून लवकरच प्रारंभ करण्यात येणार आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने या क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर जात आहे. या आधुनिक क्रीडासंकुलात पंचवीस हजार चौरस मीटर क्षेत्रफळाची बहुमजली क्रीडा इमारत उभारली जाणार आहे. यामध्ये विविध खेळांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधा उभारण्यात येणार आहेत. या क्रीडा संकुलाच्या उभारणीच्या टप्पा १ मधे इंडोर क्रीडासंकुल आणि ऑलिंपिक दर्जाचा तरणतलाव उभारण्यात येणार आहे. टप्पा दोन मध्ये स्टेडियम उभारण्यात येणार आहे. डोंबिवली शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या क्रीडा संकुलात संपूर्ण जिल्ह्यातून खेळाडू विविध मैदानी खेळांच्या सरावासाठी येत असतात. शासकीय तालुका, जिल्हास्तरावरील, आंतरशाळा क्रीडा स्पर्धा या क्रीडासंकुलात नेहमी होतात. खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे सातत्याने प्रयत्नशील होते. यासाठी शासनाकडे भरीव निधीची मागणी देखील त्यांनी केली होती. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या क्रीडा संकुलाच्या विकासासासाठी भरीव निधी मंजूर केला आहे.

# उल्हासनगर महापालिकेत शॉर्टसर्किटमुळे आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २८ (वार्ताहर)** उल्हासनगर महापालिकेत शुक्रवारी दुपारी पहिल्या मजल्यावरील उद्यान विभाग कार्यालयाच्या बाहेर शॉर्टसर्किटमुळे आग लागली. आगीने अवघ्या काही क्षणांत परिसर धुराने भरून गेला. अग्निशमन दलाने त्यावर नियंत्रण मिळवल्याने मोठी दुर्घटना टळली. या आगीत वायरिंग आणि बोर्डजवळ ठिणग्या उडू लागल्या. काही क्षणांतच धूर कॉरिडॉरच्या दिशेने पसरला आणि उपस्थित कर्मचारी व नागरिकांमध्ये एकच धावपळ उडाली. घटना समजताच सुरक्षा व अग्निशमन कर्मचाऱ्यांनी काही मिनिटांतच आग नियंत्रणात आणली.

# निवडणूक प्रचारावरील निर्बंधात बदल

## मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १० पासून प्रचारबंदी लागू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.28 :** राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांमध्ये मतदानापूर्वी लागू असलेल्या निवडणूक प्रचारबंदीच्या नियमांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाचा बदल केला आहे. विविध आदेश व अधिनियमांमध्ये भिन्न उल्लेख आढळत असल्याने या तरतुदी एकसमान करण्याच्या उद्देशाने आयोगाने प्रचार थांबविण्याची वेळ निश्चितपणे मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १०.०० पर्यंत केली आहे. ठाणे जिल्हयातील नगरपारिषदांचे मतदान दि. २ डिसेंबर २०२५ रोजी आसल्याने सुधारित अदेशानुसार दि. १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.०० नंतर सभा,

**आता पुढीलप्रमाणे नियम लागू राहतील—**

- **मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १०.०० वाजता सर्व प्रकारचा निवडणूक प्रचार पूर्णपणे थांबवावा.**
- **त्या वेळेनंतर सभांचे आयोजन, मोर्चे, प्रचारफेऱ्या किंवा ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास बंदी राहील.**
- **निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी व प्रसारण देखील तत्काळ थांबवावे.**

मोर्चे, ध्वनीक्षेपाचा वापर करता येणार नाही. प्रचार बंद होईल. अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' मधील कलम २३ नुसार मतदानाच्या दिवशी कोणतीही जाहिर सभा आयोजित करणे, भरविणे किंवा त्यात सहभागी होणे प्रतिबंधित आहे. मतदानादिवशी शांतता राखण्यासाठी ही तरतूद लागू आहे. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या "प्रसार माध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५" मध्ये मतदानाच्या एक दिवस आधी रात्री १२ पासून प्रचारबंदी लागू असे नमूद होते. तसेच ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या 'आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश' मध्ये मतदानाच्या २४ तास आधीपासून प्रचारबंदीचा उल्लेख होता. विविध आदेशांतील या वेळेतील फरकामुळे निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये आणि उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत होता. या सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने ०४ नोव्हेंबर २०२५ च्या एकत्रित आदेशातील मुद्दा क्रमांक ६ (२) मध्ये सुधारणा केली आहे. ही सुधारित तरतूद आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये एकसमानपणे लागू राहणार आहे. संबंधित सर्व अधिकृत आदेशांमध्ये हीच वेळ बंधनकारक असेल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. नागरिक, उमेदवार, राजकीय पक्ष, माध्यमे आणि स्थानिक निवडणूक यंत्रणांनी या सुधारित नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकांणी यांनी केले आहे.







# अंबरनाथमध्ये भाजपची ताकद वाढली

## प्रहार जनशक्तीचा बिनशर्त पाठिंबा !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. २८ :** अंबरनाथ नगराध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला राजकीय आधार मिळाला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाने भाजपच्या उमेदवाराला गुरुवारी (ता. २७) बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष आलम खान यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र राज्य परिषट सदस्य गुलाबराव करंजुले पाटील यांची भेट घेत ही घोषणा केली.

अंबरनाथ पूर्व मतदारसंघातील भाजप मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयातील कार्यक्रमात प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. नगराध्यक्षपदासाठी भाजप-रिपाइं महायुतीच्या उमेदवार तेजश्री विश्वजित करंजुले यांच्या शहर विकासाच्या व्हिजनवरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचे जनशक्ती पक्षाच्या आलम खान यांनी सांगितले. रस्ते, पाणी, वीज, गटारे यांसारख्या शहरातील प्रमुख समस्यांचे योग्य नियोजनबद्ध समाधान तेजश्री करंजुले पाटील देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या जाहीर पाठिंब्यामुळे अंबरनाथमध्ये भाजपची ताकद अधिक मजबूत झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. उपशहरप्रमुख दीपक पाटील, अमरनाथ पाल, खुशाल सोनकांबळे, विशाल गायकवाड, शफिक सलमान यांच्यासह सलून संघटनेचे अध्यक्ष इब्राहिम शेख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वाचक मनोगत

# स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता

कवी वसंत बापट म्हणतात...

**देह मंदिर चित्त मंदिर ।**
**एक तेथे प्रार्थना ।।**
**सत्य सुंदर मांगल्याची ।**
**नित्य हो आराधना ।।**

आपला देह व चित्त मंदिराप्रमाणे जेव्हा होईल तो सुवर्णयोग समजावा. आपण आपल्या देशात राहतो देशाची प्रगती ही आपल्या हातात असते. हाताची बोटे सारखी नसतात त्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाचा स्वभाव सारखा नसतो. प्रत्येक नागरिकांना एकत्र बांधण्याचे काम शिक्षण करते. जे शिक्षण देत आहोत ते शिक्षण निरोगी असणे आवश्यक आहे. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा असला तरी देशाच्या प्रगतीमध्ये सर्व माणसे सारखी असून भागणार नाही. त्यांच्या वेगवेगळ्या स्वभावाचा देशाच्या प्रगतीसाठी उपयोग करावयाचा आहे. प्रत्येक माणसात जी ऊर्जा असते त्याला योग्य वळण लावण्याचे काम शिक्षण करते.ज्या शिक्षणाने स्वभावातील असलेल्या वाईट सवयींचे उदात्तीकरण होते तेच खरे शिक्षण मग ते शाळेतील समाजातील निसर्गातील असो; आपण घरातील घाण काढून घर स्वच्छ करतो त्याचप्रमाणे आपल्या मनातील विद्रुंसक कल्पनांना मनातून बाहेर काढणे गरजेचे आहे.

स्वभावाची स्वच्छता- आपण आपल्या स्वभावात बदल करणार आहात काय? मनाला विचारून पहा तसे घडल्यास देह मंदिर होईल. साने गुरुजी म्हणतात, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे साने गुरुजींच्या या एका ओळीने चांगल्या विचारांची पेरणी प्रत्येक नागरिकांच्या मनात निर्माण होण्यासाठी मदतच होईल. अशा सारख्या साहित्यिक विचाराने प्रत्येक माणसाचे मन निर्माण होईल. केवळ शाळेतच नाही तर समाजामध्ये जे जे सण समारंभ साजरे करतो त्यावेळी लहान बालकावर योग्य ते संस्कार होण्यासाठी सण समारंभात अशा प्रकारचे वातावरण निर्मिती होईल असे पाहावे.लहान मूल हे मातीच्या गोळ्याप्रमाणे असते. आपण जसा आकार देऊ त्याप्रमाणे मूर्ती घडते. वरिष्ठांच्या वागण्याचा लहान मुलांवर प्रभाव पडत असतो तेव्हा मोठ्याने संस्कारक्षम वागणूक ठेवावी.

आपण केवळ आपलाच विचार करून भागणार नाही. आपण समाजासोबत देशाचे काही देणे लागतो. जसे की शेतकरी अन्नधान्य पिकवतो ते स्वतःसाठी नाही तर उरलेले अन्य धान्य जनता जनार्दनांना देतो म्हणजे स्वतः सोबत इतरांचाही विचार करतो असाच विचार आपण सर्वांनी करावयास हवा असा विचार आपण करतो का? असे झाल्यास देह व चित्त मंदिर होईल तो दिन सुवर्ण योगाचा समजावा यासाठी कवितेच्या चार ओळी

**जागृतीचा नवा विचार | देह उन्नतीचा अविष्कार ||**
**संस्काराची उघडू या गाठोडी | सदा सत्संग घडोघडी ||**
**जय हिंद जय महाराष्ट्र**

**श्री गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण खालापूर**

# तळवली केंद्राच्या वतीने वार्षिक क्रीडा महोत्सव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि. (प्रतिनिधी) :** संविधान दिनी भिवंडी तालुक्यातील तळवली केंद्राच्या वतीने शालेय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. २६ नोव्हेंबर या संविधान दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील तळवली केंद्राच्या वतीने कुकसे येथील मैदानावर शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव घेण्यात आला. क्रीडा महोत्सवाची सुरुवात संविधान प्रतिमेचे पूजन व राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार



अर्पण करून करण्यात आले. यावेळी संविधान प्रास्ताविकेचे सामूदायीक वाचन करण्यात आले तर यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून केंद्रप्रमुख अनघा भोईर तर प्रमुख पाहुणे म्हणून वाहुली गावचे पोलीस पाटील दिलीप धनगर उपस्थित होते यावेळी दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आपल्या भाषणातून शुभेच्छा दिल्या. या वार्षिक क्रीडा महोत्सवात केंद्रातील बारा शाळेतील १२५ विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते, तर स्पर्धेच्या नियोजनासाठी २५ शिक्षक उपस्थित होते या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो,१०० मीटर धावणे आणि लेझीमच्या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनीं सहभाग घेऊन स्पर्धेत रंगत आली.तसेच विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवत खेळ, क्रिडांगण नियम आणि शिस्तीचे पालन केले. उपस्थितांनी भारतीय संविधानातील मूल्ये आणि क्रीडा स्पर्धेला जोडणारा संदेश यावेळी दिला.विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुणे दिलीप धनगर यांच्या हस्ते पदक, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल विद्यार्थ्यांनी, पालकांनी समाधान व्यक्त केले.

# कंटेनरच्या धडकेत प्रवासी रिक्षाचालकाचा दुर्दैवी मृत्यू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि.२७ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोईरपाडा गावाच्या हद्दीतील मुंबई नाशीक महामार्गावर कंटेनरच्या धडकेत एका रिक्षाचालकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

रीफ मंहमूद शेख (३८) रा.अर्जुनली असे अपघातात मृत्यू झालेल्या प्रवासी रिक्षाचालकांचे नाव असुन तो बुधवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे प्रवासी घेण्यासाठी मुंबई नाशीक महामार्गावरील हॉटेल शिवसागरच्या बाजुला असलेल्या बी. जी. आर. लॉजेस्टीक पार्कच्या गेटवर रिक्षाबाहेर उभा होता तेंव्हा शिवसागर हॉटेलच्या बाजुकडुन विरुध्द दिशेने भरधाव आलेल्या एक छोट्या कंटेनरने त्याला जोरदार धडक दिली.यात रिक्षाचालक शरीफ यांचा जागीच मृत्यू झाला अपघाताचा गुन्हा पडघा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असुन कंटेनर चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पंचनाम्यानंतर मृतदेहाचा पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सदर घटनेचा अधीक तपास पडघा पोलीस करीत आहेत. मुंबई नाशिक महामार्गावर भरधाव कंटेनर, अवजड व विविध ठिकाणी विरूध्द दिशेने चालणाऱ्या वाहनांवर कुणाचेही नियंत्रण नसल्याने अपघात वाढ होऊन निष्पाप नांगरीकाना नाहक आपला जिव गमवावा लागत असल्याचे स्थानीक नागरीकांनी सांगितले.

## कल्याण पूर्वेतील लोक-हित-वर्धक संघाचे आयोजन

# बाबासाहेबांच्या स्मारकासाठी जागा देणाऱ्या भूमिपुत्रांचा सन्मान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** माजी आमदार गणपत गायकवाड यांनी स्थापन लोक-हित-वर्धक संघ या संस्थे बरोबरच कल्याण पूर्वेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समिती तसेच माता रमाबाई जयंती उत्सव समिती या संस्थेंच्या संयुक्त विद्यमाने कल्याण पूर्वेत संविधान दिनी संविधान दिन गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात कल्याण पूर्वेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राच्या निर्मितीसाठी आपल्या मालकी हक्काची जागा आमदार गणपत गायकवाड यांच्या विनंती वरून दान करणारे स्मारकाचे जागा मालक तसेच या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची सर्वात प्रथम मागणी करणारे जेष्ठ बौद्ध बांधव यांचा सत्कार करण्यात आला.

संविधान दिना निमित्त आमदार सुलभा गायकवाड यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली प्रभाग ड कार्यालयाच्या प्रांगणात 'संविधान सन्मान गीत संध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इंडियन आयडॉल फेम गायक राहुल सक्सेना, आंबेडकरी विचरवंत आणि प्रसिद्ध गायक शिरीष पवार, प्रवीण ढोणे, मिरा भालेराव, रोहिता उन्हवणे, सुप्रसिद्ध निवेदक सुशीलकुमार चोरघे आदी कलाकारांनी 'संविधान सन्मान गीत संध्या' हा विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून समाज प्रबोधन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पंचशील महिला मंडळाच्या उपासिकांनी बुध्द वंदना व भिमस्तुती घेवून तथागत गौतम बुध्द आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना त्रिवार वंदन करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान माजी आमदार गणपत गायकवाड यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाप्रती असलेल्या भूमिके विषयीची एक चित्रफित दाखवण्यात आली.

# कल्याण डोंबिवली महापालिका उद्याने आता सुरक्षित व सुशोभित

**शहरांतील उद्यानात CCTV यंत्रणा व डेकोरेटीव्ह प्रकाश व्यवस्था**





> महापालिकेचा उद्यानात नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व उद्यान सुशोभिकरणासाठी एकूण रक्कम रु. ३०० लक्ष इतका खर्च झाल्याचे व महापालिकेने नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व तसेच सुशोभिकरणाची केलेली सि.सि.टि.व्ही व डेकोरेटिव्ह प्रकाश व्यवस्था बाबत नागरीकांनी समाधान व्यक्त केले असून महापालिका आयुक्तांचे आभार मानले आहेत.
>
> **- प्रशांत रा. भागवत**
> **अतिरिक्त शहर अभियंता**
> **(विद्युत/यांत्रिकी)**
> **कल्याण डोंबिवली महानगरपालिका**


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महापालिकेने सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकात महापालिकेच्या सर्व उद्यानात नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी सि.सि. टि.व्ही यंत्रणा व तसेच नागरीकांना उद्यानात फिरताना सुखद व सुरक्षित वाटावे म्हणून डेकोरेटिव्ह प्रकाश व्यवस्था करण्याचे उद्दीष्ट निश्चित केले होते. महापालिका आयुक्त श्री. अभिनव गोयल, यांनी महापालिका उद्यानात नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सर्व कामे तातडीने नियोजन करुन मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश विद्युत विभागास दिले होते.

विद्युत विभागाने महापालिकेच्या उद्यानात नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सि.सि. टि.व्ही यंत्रणा व तसेच नागरीकांना उद्यानात सुखद व सुरक्षित वाटावा म्हणून डेकोरेटिव्ह प्रकाश व्यवस्था करण्याचे काम फास्ट ट्रॅक वर नियोजन करुन महापालिका अंदाज पत्रकात निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण केले.

महापालिकेत नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी शेनाळे तलाव कल्याण, नाना धर्माधिकारी उद्यान कल्याण, रमाबाई आंबेडकर उद्यान कल्याण, रुक्मिणीबाई दवाखाना कल्याण, मिनाताई ठाकरे उद्यान डोंबिवली, सावित्रीबाई फुले रंगमंदिर डोंबिवली, क्रिडासंकुल तरण तलाव डोंबिवली, आनंद नगर उद्यान, भागशाळा मैदान डोंबिवली या ठिकाणी एकूण १७९ सी.सी टी. व्ही यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. तसेच कारभारी उद्यान कल्याण, धर्मवीर आनंद दिघे उद्यान कल्याण, नाना धर्माधिकारी उद्यान कल्याण, चौधरी मोहल्ला उद्यान कल्याण, सावरकर उद्यान डोंबिवली, नाना नानी पार्क उद्यान डोंबिवली, मिनाताई ठाकरे उद्यान डोंबिवली या ठिकाणी १६७ डेकोरेटिव्ह पोल उभारुन डेकोरेटिव्ह प्रकाश व्यवस्था उभारण्यात आली आहे.

## 'नीती - अनीतिच्या द्वंद्वात अडकलेल्या अवयवदानाच्या वास्तविकतेवर परखड भाष्य



# निब्बाण



**महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने 64 वी राज्य मराठी नाट्य स्पर्धा कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिर केंद्रावर सुरू आहे. ऐतिहासिक, राजकीय, बालनाट्य, क्राईम, सामाजिक अशा विविध विषयांना हात घालणारी नाटके या स्पर्धेतून सादर होत आहेत. 27 नोव्हेंबर रोजी सादर झालेल्या निब्बाण या नाटकाने अवयवादानासारख्या संवेदनशील विषयाला हात घालत अवयवदानात आपण किती मागासलेले आहोत याची जाणीव करून दिली. कायद्याच्या चौकटी, भावनिक बंध, जनजागृतीचा अभाव, आर्थिक लागेबांधे या सगळ्या कारणांमुळे अवयवदान ही प्रक्रिया क्लिष्ट आणि किचकट होताना दिसते. काहीसा असाच विषय घेऊन 'सविता नाट्य निर्मिती कला मंच' यांनी सादर केलेलं "निब्बाण" हे नाटक किमान याविषयी लोकजागृती करेल आणि अवयवादानाबरोबरच अवयवदान करणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या नातेवाईकांना नवा विचार आणि नवी प्रेरणा देईल असे वाटते, अर्थात नाटकातून रुजवण्यात आलेले विचार हे वस्तुनिष्ठ आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे जरी नसले तरी त्यावर चिंतन करायला लावणारी नाट्य कलाकृती म्हणजे निब्बाण !**

निब्बाण म्हणजे बौद्ध धर्मातील सर्वोच्च ध्येय आहे, ज्याचा अर्थ 'विझणे' किंवा 'शांत होणे' असा होतो. हे ज्ञानप्राप्ती, दुःखाचा अंत आणि लोभ, द्वेष व अज्ञान या तीन नकारात्मक भावनांचा नाश होण्याची अवस्था आहे. एकदा निर्वाण प्राप्त झाल्यावर, व्यक्ती जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून मुक्त होते. लेखक दिग्दर्शक दिनेश जाधव यांनी अवयव दानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी अतिशय सुंदर विषय लेखनबद्ध करून त्याला नाट्यस्वरूप दिलं आहे. नाटकाचे नेपथ्य खूपच सुंदर होतं. प्रकाशव्यवस्था, स्थिरचित्रण, फ्लॅशबॅक अशा बहुविध अविष्कारांनी हे नाटक संपन्न बनलंय! एक दोन अपवाद वगळले तर शोधूनही चूक काढता येणार नाही; इतकी सुंदर नेपथ्य निर्मिती आणि तितक्याच सरस अभिनयाने नाटकातील जिवंतपणा जाणवतो.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी 'परिप्लुत' असलेलं हे नाटक भगवान गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञान आणि शिकवणुकीवर सुद्धा आधारित आहे. अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, शिक्षणाचे महत्त्व, राजकारण्यांचे डावपेच, सामान्य आणि मध्यमवर्गीय लोकांची होणारी पिळवणूक, उत्सव आणि आरोग्यवस्थेचं बाजारीकरण अशा विषयांना या नाटकाने धावता स्पर्श केला आहे. अर्थात हे विषय मूळ कथानकापासून वेगळे असले तरी त्यांना मूळ कथेत कलात्मकतेने गोवण्यात आलेलं आहे.

अवयव दानात आपण किती मागासलेले आहोत शिवाय अवयवदानामागे कोणत्या पद्धतीचं राजकारण आणि अर्थकारण चालतं हे पटवून देण्यासाठी लेखकांन व्यवसायाने इंजिनियर असलेल्या आदित्य पटवर्धन ह्या पात्राला कथेचा मुख्य नायक केले आहे. दारूच्या व्यसनामुळे लिव्हर सोरायसिस झालेल्या पटवर्धनांना लिव्हर ट्रान्सप्लांट सर्जरीसाठी सुहास कुलकर्णी नावाच्या, ऑर्गन ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर कडे जावं लागतं. कुलकर्ण्यांच्या केबिनमध्ये झालेला संवाद हा या नाटकाचा मूळ गाभा आहे. दोन्ही पात्रांनी थोडे पटणारे,

थोडे न पटणारे,

काही तत्त्वज्ञानाला धरून, तर कधी भावनांना सोडून केलेला नैतिक, वैचारिक आणि भावनिक द्वंद्वात्मक संवाद म्हणजे निब्बाण ! कुलकर्णी आणि पटवर्धन यांच्यातले संवाद पटण्यासारखे नसले तरी ते विचारांना चालना नक्कीच देतात.

पटवर्धन सारख्या धनदांडग्या, व्यसनाधिन व्यक्तीला एका निरोगी, आणि विशेष म्हणजे व्यसनमुक्तीसाठी काम करणाऱ्या तरुणाच्या अवयवांचं प्रत्यारोपण दान स्वरुपात करणे हे विरोधाभास कितपत योग्य आहे ? यावर सुहास कुलकर्ण्यांचा प्रतिवाद विचार करण्यास भाग पाडतो. आपले अवयव कुणाला द्यावेत असं जरी कायद्यात प्रावधान नसलं तरी अवयव दान करणाऱ्याला तो अधिकार का मिळू नये? असा सामाजिक विचार या नाटकातून मांडण्याचा दर्जेदार प्रयत्न झालाय.

अवयवादानातील उदासीनतेमुळे आज शेकडो शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षा यादीत आहेत. पटवर्धन हे त्यातीलच एक ! पटवर्धन यांचा वेटिंग नंबर 50वा असतो तो 50 वरून 16 व्या क्रमांकावर नंतर 16 व्या 5 आणि 5 वरून पहिल्या क्रमांकावर कसे येतो हा प्रसंग म्हणजे अवयव दान आणि त्यामागील वैद्यकीय, तांत्रिक आणि कायदेशीर बाबींचे भयाण वास्तव आहे.

**लेखक / दिग्दर्शक : दिनेश जाधव**

---

**प्रकाश योजना :-** साई शिरसेकर
**संगित :-** महेंद्र मांजरेकर
**रंगभुषा:-** चंद्रशेखर केमनाईक
**नेपथ्य :-** प्रदिप पाटिल
**वेशभुषा :-** सुजय पवार

---

**पात्र परिचय**

**कुलकर्णी :-** अजित देशमुख
**पटवर्धन :-** दिनेश जाधव
**विश्वजित :-** समाधान लोंढे
**आई :-** तन्वी बनसोडे
**थोरवे :-** सुजय पवार
**बुद्ध मूर्ती :-** कुमार दर्शन अजित देशमुख





व्यसनमुक्ती सारख्या सामाजिक विषयांवर पथनाट्यातून जनजागृती करणाऱ्या तरुणाच्या मृत्यूनंतर कायद्यानुसार वेटिंगवर असलेल्या रुग्णांना त्याचे अवयव दान करण्याचं ठरतं. अवयव उपलब्ध झाल्याने पटवर्धन यांना कॉल येतो. दानकर्त्याच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची पटवर्धनांची इच्छा होते; परंतु ते गोपनियता आणि कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याने कुलकर्ण्यांकडून त्यास विरोध होतो. अर्थात शस्त्रक्रियेसाठी अवयव उपलब्ध झाल्याने रुग्ण खुश होतो, रुग्णाकडून बिलाची भली मोठी रक्कम मिळणार असल्याने रुग्णालयही खुश असते आणि आपल्या नातेवाईकांच्या मृत्यू पक्षात अवयव दानामुळे दानकर्त्याच्या परिवारालाही आर्थिक हातभार लागू शकतो? असा विचार या वाद-प्रतिवादातून मांडला आहे. मुळात हा संवाद विज्ञान आणि कायद्याच्या चौकटीत बसत नसला तरी आत्मचिंतनाला भाग पाडतो. शेवटी रुग्णाच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याचा मानस पटवर्धनांना गुंडाळून ठेवावा लागतो, दानकर्त्याच्या नातेवाईकांना मदत करण्यासाठी मधला मार्ग म्हणून कुलकर्णी पटवर्धनांना व्यसनमुक्त होण्यासाठी सुचवतात. मात्र पटवर्धनांना ते शक्य नसल्याने हताश होऊन ते ऑर्गन ट्रान्सप्लांट सर्जरी पासून परावृत्त होतात..

....या पुढे काय होतं? पटवर्धनांवर अवयव प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया होते का? आणि होत असेल तर का? या प्रश्नांचं गुपित या नाटकाच्या मध्यंतराच्या उत्तरार्धात सापडत असल्याने प्रेक्षकांनी हे नाटक जरूर पहावं. सुरुवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणे नाटकातील काही बाबी कायद्याच्या आणि विज्ञानाच्या चौकटीत बसत नसल्या तरी त्यावर चिंतन करण्यास नक्कीच प्रवृत्त करतील यात शंकाच नाही. अवयव प्रात्यारोपण करताना जैविक चाचण्या घेतल्या आणि जुळवल्या जातात; मात्र वैचारिक चाचण्यांचं काय? त्याही जुळायला हव्यात की नको? असा विचार नाटकातून मांडण्यात आलाय. हे वैचारिक नाटक सध्या प्रायोगिक स्वरूपात असलं तरी व्यावसायिक स्वरूपात सादर करण्यास काहीच हरकत नाही!

**मृत्यू नंतर अवयव दान करून एखादयास नवजीवन देणे हे एक उदात्त कार्य असले, तरी मुळातच मानवी जीवन ही विविध विकारांनी भरलेले आहे. त्या विकारांचा मानवी स्वभावावर फरक पडत असतो त्यातूनच नैतिक, अनैतिक नीती, अनीती या संकल्पना जन्माला येतात. शरीरातील षडरिपूवर विजय मिळवून शून्य अवस्थेत पोहोचल्यास या विकारांवर विजय मिळविणे सोपे असते असे बुद्ध म्हणाला खरे पण स्थिर राहील ते मन कसले? असेच दोन अस्थिर जीव एक याचक आणि दूसरा मृत अवयव दाता जे अनीती आणि नीती या दोन परस्पर भिन्न वेगवेगळ्या पातळ्यांवर जगत आलेत आणि अवयव प्रत्यारोपण माध्यमातून एकत्र येत असतील तर हा जो मिलाप आहे तो जांचा जळलेल्या जैविक चाचण्या सारखाच साधारण असेल? प्रश्नाचे उत्तर पहायचे असेल तर निब्बाण नाटक !**

# भविष्यवेध



**शनिवार**
**29 नोव्हेंबर 2025**

**मेष**
मद्यपानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस. धन हानी होण्याची शक्यता आहे. देवाण-घेवाणीत सतर्क राहाणे तुमच्यासाठी चांगले.

**वृषभ**
दिवस अत्यंत महान आहे, कामाकडे लक्ष जाईल, जे लोक पैश्याला विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे धनाची बचत करा.

**मिथुन**
एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. दिवस चांगला जाणार आहे. जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे उत्सवाचे वातावरण असेल

**कर्क**
सकारात्मक संवाद होतील. प्रत्येक काम नियोजित रीतीने आणि एकाग्रतेने केल्यास यश मिळेल. गुंतवणुकीशी संबंधित महत्त्वाच्या योजनाही यशस्वी होतील.

**सिंह**
दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुमचे विशेष काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका. फळाची अपेक्षा नको.

**कन्या**
मनोरंजक , माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी वेळ घालवाल, कोणतेही महत्त्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. वरिष्ठांची मर्जी सांभाळाल. समधान मिळेल.

**तुळ**
विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील, आज एक नवीन भेट आणली आहे. आज तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील. देवपूजेत दिवस व्यतित होईल.

**वृश्चिक**
प्रियकरासाठी दिवस अनुकूल आहे. कोणाशीही वादात पडू नका अहंकारावर नियंत्रण ठेवा. जास्त विचार केलात तर काही महत्त्वाची उपलब्धी हातून जाईल.

**धनु**
योग्य निर्णय घेणे खूप महत्वाचे आहे. आजच्या दिवसाची सुरुवात चांगली होईल. आज तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन हवे ते सर्व साध्य करता येईल.

**मकर**
संवादाशी संबंधित काही नवीन तंत्रज्ञानाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुमच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये तुमची चांगली प्रतिमा तयार होईल. चिंता नाहीशी होईल.

**कुंभ**
तब्येत एकदम ठीक राहील. दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल. आपल्या खर्चात उदार होऊ नका

**मिन**
इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे जीवनात शांतता येईल. दिवस आत्मविश्वास आणि अपेक्षांचा आहे. कोणत्याही परिस्थितीत निराश होऊ नका.



# गडकरी रंगायतनात रंगणार संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती संगीत समारोह

**गायिका आशा खाडिलकर यांना पं. संगीतभूषण राम मराठे राज्यस्तरीय पुरस्कार तर युवा पुरस्कार कथ्थक नृत्यांगना निधी प्रभू यांना रसिकांना मिळणार गायन, वादन आणि नृत्याची मेजवानी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्यावतीने 5 डिसेंबर ते 7 डिसेंबर 2025 या दरम्यान 30 वा संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती समारोह रंगणार आहे. सायं. 7.00 वा. महोत्सवाची सुरूवात होणार असून रसिकांना शास्त्रीय गायनाबरोबरच कथ्थक नृत्य, संगीत नाटकाची मेजवानी मिळणार आहे. राम गणेश गडकरी रंगायतन येथे हा महोत्सव सुरू राहणार असून विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमाचा आस्वाद रसिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, पं. मुकुंद मराठे, पं. मुकुंद देव, पं. विवेक सोनार, तबलावादक रवी नवले उपस्थित होते.

शुक्रवार 5 डिसेंबर रोजी सायंकाळी 7.00 वा. महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. आपल्या अनेक दशकांच्या समृद्ध गायनप्रवासाने महाराष्ट्राच्या संगीत परंपरेला अमूल्य योगदान देणाऱ्या व आपल्या आवाजातील माधुर्य, श्रुतीसाधना, स्पष्ट उच्चार व भावपूर्ण अभिव्यक्तीमुळे आपण महाराष्ट्राची एक मानबिंदू कलावंत म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या आशा खाडीलकर यांना संगीतभूषण पं. राम मराठे पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. रोख रुपये 51,000/- सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

कथ्थक या अभिजात भारतीय नृत्यप्रकाराच्या युवा साधक म्हणून संगीताची साधना करणाऱ्या निधी प्रभू यांना पं. राम मराठे युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रोख रुपये 25,000/- सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रात्री 8.00 वा. होणार आहे. तद्नंतर रात्री 8.30 वा. पं. सुरेश बापट यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर सुहास चितळे व हार्मोनियमवर नीला सोहोनी साथसंगत करणार आहेत.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि. 6 डिसेंबर रोजी सायं. 5.00. श्री. राजेंद्र गांगाणी यांचे कथ्थक नृत्य सादरीकरण आहे. रात्री. 8.00 वा. गायिका आरती अंकलीकर यांच्या गायनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. त्यांना तबल्यावर रोहित देव, तर हार्मोनियमवर सिध्देश बिचोलकर साथसंगत करणार आहे. तर रात्री 9.45 वा. उस्ताद शाहीद परवेझ यांचा सितारवादनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर उन्मेष बॅनर्जी साथसंगत करणार आहेत.

तर रविवार 7 डिसेंबर रोजी सकाळी 10.00 वा. वैशाली पोतदार यांच्या नृत्याचा कार्यक्रम सादर होणार आहे. सकाळी 11.00 वाजता सावनी परेकर यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर अथर्व आठल्ये तर हार्मोनियमवर अमेय गांधी साथसंगत करणार आहे. दुपारी 12.00 वाजता पं. अनंत जोशी यांचा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना समीर गानू, अक्षय अभ्यंकर, अभय दातार साथसंगत करणार आहेत. तर दुपारी 3.00 वाजता वाघांबे, गुहागर येथील संवेदना आर्टस निर्मित 'जय जय गौरीशंकर' हे संगीत नाटक सादर होणार आहे. रात्री 8.00 वा. पं.सुरेश तळवलकर हे वादन सादर करणार असून त्यांना सावनी तळवलकर- तबल्यावर अभिषेक शिनकर, हार्मोनियमवर नागेश आडगावकर, गायनासाठी रोहित खवळे, पखवाजवर ईशान परांजपे, कहोजवर ऋतुराज हिंगे, तर अभिषेक भुरूक ड्रम्स वर साथसंगत करणार आहे. रात्री 9.30 वा. पं. राजा काळे यांचा गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर मंदार पुराणिक तर हार्मोनियमवर सिध्देश बिचोलकर साथसंगत करणार असून या कार्यक्रमाने समारोहाची सांगता होणार आहे.

हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी विनामूल्य असून याकार्यक्रमाच्या प्रवेशिका राम गणेश गडकरी रंगायतन, नाट्यगृहावर उपलब्ध होणार आहेत. तीन दिवस सुरू असणाऱ्या महोत्सवास उपस्थित राहणाऱ्या रसिक प्रेक्षकांमधून प्रत्येक दिवशी एक भाग्यवान (लकी ड्रॉ) रसिक निवडला जाणार असून त्या रसिकास भेटवस्तू दिली जाणार आहे. तरी ठाणेकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)

### समाज विकास विभाग

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील तृतीयपंथी नागरिकांसाठी स्वयंरोजगाराकरीता विविध कोर्सचे प्रशिक्षण प्राथमिक स्वरुपात प्रत्येकी कोर्सनिहाय २० तृतीयपंथी प्रशिक्षणार्थी ठरविण्यात येवून त्यांना प्रशिक्षण देण्याबाबत नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेकडील मंजूर दरानुसार प्रशिक्षण देणे करिता खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे बंद लिफाफ्यांतील अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) समाज विकास विभाग, कल्याण डोबिंवली महानगरपालिका, शिवाजी चौक, कल्याण येथे ८ दिवसांच्या आत स्विकारण्यात येतील.

**(कालावधी २९/११/२०२५ ते ०६/१२/२०२५)**

| अनु. | तपशिल | एकूण तास | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट कोर्स | ३६० | २० |
| २ | हेअर ड्रेसर आणि स्टायलिस्ट | ३९० | २० |
| ३ | Cosmetologist | ७५० | २० |
| ४ | Soap Maker Handmade | ३०० | २० |
| ५ | अगरबत्ती मेकिंग | ४८० | २० |
| ६ | Self Employed Tailor | ३६० | २० |
| ७ | Auto Rikshaw Driver | ३०४ | २० |
| ८ | Light Motor Vehicle Driver | ३०४ | २० |

**अटी व शर्ती**

१. संस्था/VTP यांची नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) किंवा महाराष्ट्र स्टेट स्किल डेव्हलपमेंट सोसायटी (MSSDS) यांचेकडे नोंदणी केलेली असावी.
२. शासकीय / निमशासकीय संस्थांमध्ये कमीत कमी रु. २० लाख पर्यंत प्रशिक्षण देण्याचे कामाचा मागील सलग २ वर्षाचा अनुभवाचा दाखला असणे आवश्यक आहे.
३. प्रशिक्षण केंद्र हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील असावी. (GPS Photo सहित)
४. संस्थेकडे जागा/प्रशिक्षण दालन असल्याचे कागदपत्रे जोडावे. (मालकी/भाडे तत्वावरील जागा)
५. नेमणूक करण्यात येणाऱ्या प्रशिक्षकाचे (Trainer) शैक्षणिक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
६. GST प्रमाणपत्र जोडावे.
७. निविदाधारकाचे EPF प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे
८. संस्थेचे पॅनकार्ड तसेच मागील ३ वर्षांचे आयकर भरल्याचे विवरणपत्र जोडावे.
९. संस्थेस काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे लेटरपॅड वरील हमीपत्र जोडावे.
१०. निविदाधारकाच्या संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी उलाढाल प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले असावे. (सरासरी १ करोड)
११. व्यवसाय कर (Professional Tax) प्रमाणपत्र जोडावे.
१२. प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर Skill Development कडील प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

**जावक क्रमांक :-**
**१) कडोंमपा/सविवि/मुका/५३९- दिनांक २८/११/२०२५**
**२) कडोंमपा/जसंवि/मुका/७१९ - दिनांक २८/११/२०२५**

**सही /-**
**(संजय जाधव)**
**उप आयुक्त (समाज विकास विभाग)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**


# केडीएमसी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी KIDLET App माध्यमातून अध्यापन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शैक्षणिक वर्ष 2025 -26 हे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळांसाठी शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीचे वर्ष आहे .हे मिशन आणि विजन घेऊन कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल , शिक्षण विभाग उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी भारत बोरणारे आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी जून महिन्यापासूनच विद्यार्थी तसेच शिक्षक यांच्यासाठी विविध भौतिक तसेच शैक्षणिक सोयी सुविधा मोठ्या संख्येने पुरविण्यास सुरुवात केली आहे. शैक्षणिक गुणवत्ता विकास आणि त्यामधील सातत्याने वाढ हाच या सर्व उपक्रमांमागील मुख्य उद्देश होय.

या अंतर्गतच महानगर गॅस यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत kidlet App च्या माध्यमातून लर्निंग इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील 33 शाळांमध्ये सुरू करण्यात आला आहे. याचे प्राथमिक प्रशिक्षण शनिवार दिनांक 22 नोव्हेंबर 2025 रोजी डोंबिवली येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक 21, आयरे येथे संपन्न झाले.

सदर प्रशिक्षणासाठी महानगर गॅस CSR कमिटी सदस्या प्रियांका दळवी , देवेश सर तसेच kidlet App चे सागर बापट, हिना मळेकर तसेच मंदार अटकेकर हे प्रतिनिधी ,उपक्रमाचा लाभ होणाऱ्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या 33 शाळातील 65 शिक्षकांना आजचे प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शिकविण्यात आलेला पाठ्य घटकाची आजच्या माध्यमातून बहुपर्यायी प्रश्न प्रकाराद्वारे पडताळणी कशी करायची याबाबत माहिती देण्यात आली. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे मूल्यांकन करण्यासाठी तसेच त्याद्वारे योजावयाच्या उपचारात्मक अध्यापनासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.



# वसई विरार महापालिकेचं दुर्लक्ष ! सुशोभित दुभाजकांची दुर्दशा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार महापालिकेकडून रस्त्याच्यामधोमध असणाऱ्या दुभाजकांचे सुशोभीकरण करण्यात आले होते. पण, गेल्या काही काळात दुभाजकावरील रोपांची झालेली पडझड, पानाच्या पिचक्या तसेच जीर्ण झालेले बांधकाम यामुळे दुभाजकांची दुर्दशा झाली आहे. एकाच रस्त्यावरील विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना वेगळे करण्यासाठी, रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी, तसेच वाहनांची वाहतूक विशिष्ट दिशेने वळवण्यासाठी आणि प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश रोखण्यासाठी महापालिकेकडून मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांवर दुभाजक उभारण्यात आले होते. तर काही वर्षांपूर्वी विविध प्रकारच्या रोपांची लागवड करून, सुंदर चित्र काढून दुभाजकांचे सुशोभीकरण करण्यात आले होते.

# आयुक्त अभिनव गोयल यांनी केली २७ गावातील अमृत पाणीपुरवठा योजनेच्या कामांची पाहणी!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सन 2015 मध्ये, नव्याने समाविष्ट झालेल्या 27 गावांसाठी केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आलेली होती. सन 2015 मध्ये जेव्हा ही गावे समाविष्ट झाली तेव्हा त्या गावांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी उंच जलकुंभ, बुस्टर टाक्या ,संप व पंप हाऊस उपलब्ध नसल्याने या गावांना पाणीपुरवठा होण्यामध्ये अनेक अडचणी येत होत्या.

या गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे गुरुत्व वाहिनी द्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. येणाऱ्या उन्हाळ्यामध्ये 27 गावांना पुरेसा पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने सदरच्या योजनेचे काम पूर्ण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे ही बाब आयुक्त अभिनव गोयल यांच्या निदर्शनास आली त्यामुळे या योजनेस गती देऊन सदरची योजना मार्च 26 अखेर अस्तित्वातील वितरण वाहिन्यांच्या साह्याने पूर्ण करण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांनी प्रत्यक्ष विविध ठिकाणी चाललेल्या कामावर भेट देऊन आत्तापर्यंत झालेल्या कामाची पहाणी केली. तसेच प्रत्येक ठिकाणी जी कामे शिल्लक आहेत ती वेगाने पूर्ण करण्याचे ठेकेदारास निर्देश दिले. कोणत्याही परिस्थितीत या योजनेतील आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चरची कामे विहित मुदतीत पूर्ण करून योजना मार्च 26 अखेर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक पाईपलाईन ,आवश्यक कामगार वर्ग उपलब्ध करून देण्याचे ठेकेदारास व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, पीएमसी या नात्याने सदर योजना महापालिकेला ठरवलेल्या विविध मुदतीत पूर्ण करून हस्तांतरित करण्याचे तसेच प्रत्येक महिन्याला अहवाल सादर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले . ही योजना पूर्ण झाल्यावर 27 गावाच्या पाणीपुरवठ्यामध्ये निश्चितपणे सुधारणा होणार असल्याचे गोयल यांनी सांगितले.



**विहित मुदतीत कामे पूर्ण करून मार्च 2026 अखेर योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना निर्देश**

# डोंबिवलीच्या जोंधळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गिरवले स्वच्छतेचे धडे




**महापालिका आणि सुमित एल्कोप्लास्टच्या माध्यमातून घनकचऱ्याबाबत जनजागृती !**

**२५० विद्यार्थ्यांचा सहभाग !**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** शालेय विद्यार्थी हे उद्याचे नागरिक,उद्याचे भविष्य असं समजलं जातं. मात्र ते केवळ नागरिक म्हणून नाही तर समाजातील एक जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ नागरिकही असावेत, या उद्देशाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि सुमित एल्कोप्लास्टच्या आयईसी (Information - Education - Communication) टीमतर्फे आज डोंबिवलीतील एस.एच. जोंधळे विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालयात घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,ज्यामध्ये जोंधळे महाविद्यालयाच्या तब्बल 250 विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवत स्वच्छतेची शपथही घेतली.

कल्याण डोंबिवली शहरांना स्वच्छतेच्या बाबतीमध्ये अग्रेसर करण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाकडून विविध प्रयत्न तसेच सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महापालिकेच्या ह प्रभागातील शाळा - महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना ओला, सुका आणि घरगुती घातक कचरा यांसारख्या कचऱ्याच्या विविध प्रकारांची माहिती देण्यात आली. तसेच सार्वजनिक ठिकाणी घाण करणे टाळावे आणि इतरांनाही तसे करण्यापासून रोखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाचीही असल्याचे यावेळी सांगण्यात आले, तर कचरा विभाजनाचे महत्त्व आणि घराघरात त्याची काटेकोर अंमलबजावणी कशी आवश्यक आहे आणि विद्यार्थी म्हणून तुम्ही यामध्ये कशा पद्धतीने महत्त्वाची भूमिका बजावू शकतात याबाबतही कल्याण डोंबिवली महापालिका - सुमित एल्कोप्लास्टच्या अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन रण्यात आले.

याबरोबरच महापालिकेच्या 'सात दिवस – सात प्रकारचा कचरा' या आठवड्याच्या कचरा संकलन पद्धतीचे स्पष्टीकरण देत ओला कचरा तसेच सॅनिटरी पॅड आणि डायपर्ससारख्या धोकादायक घरगुती कचऱ्याचे दररोज संकलन कसे केले जाते, याची माहिती देण्यात आली. 'झिरो वेस्ट' संकल्पना आणि घरच्या घरी कंपोस्टिंग करण्याच्या विविध पद्धतीही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.




# शिधावाटप कार्यालय आपल्या दारी उपक्रमातून सुटल्या रेशनिंगच्या समस्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : प्रतिनिधी**

**शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्यातील नागरिकांच्या सोयीसाठी शिधावाटप कार्यालयातर्फे सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून वागळे विभागप्रमुख, माजी नगरसेवक एकनाथ भोईर व माजी नगरसेविका एकता एकनाथ भोईर यांचे वतीने ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र. १५ मधील नागरिकांसाठी रेशन कार्ड संदर्भातील त्रुटी निवारणासाठी २७ नोव्हेंबर २०२५ ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान, सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत शिवसेना शाखा आंबेवाडी येथे शिबिर आयोजित करण्यात आले होते.**



शिबिरामध्ये शिधावाटप पत्रिका आधार लिंक करणे, रेशन कार्ड दुरुस्ती,नाव समाविष्ट / वगळण्यासंबंधी मार्गदर्शन,नवीन रेशन कार्डसाठी अर्ज, शिधा वाटपासंदर्भातील नागरिकांच्या समस्या निवारण, विविध कागदपत्रांच्या पडताळणीबाबत सहाय्य आदी सुविधा उपलब्ध करू देण्यात आल्या आहेत.

"माझा प्रभाग, माझा विभाग, माझी जबाबदारी...!" या घोषवाक्याप्रमाणे नागरिकांची सेवा हीच आमची प्राथमिकता असल्याचे सांगून शिवसेनेच्या या उपक्रमांमुळे नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले. स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी सतत जनतेच्या समस्यांसाठी काम करत आहेत. या शिबिरामुळे नागरिकांना लेणार त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे असे वागळे विभाग प्रमुख माजी नगरसेवक एकनाथ भोईर यांनी सांगितले. सदर कार्यक्रम उदघाटन प्रसंगी माजी नगरसेविका राधा फत्ते बहादूर सिंग, परिवहनचे माजी सभापती दशरथ यादव हे उपस्थित होते.

सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी उपविभाग प्रमुख आर एल त्रिपाठी, शहाजी मोहिते, दत्तात्रय कुलकर्णी, शिवाजी काचगुंडे, बालाजी कांबळे, कृष्णप्रकाश तिवारी, राजेंद्र देसाई, राजेंद्रदेसाई, अशोक चव्हाण, संतोष जाधव, संदीप म्हाडसे, आस्वाद गुरव, मनोज साळवी, विलास राऊत, राजेश माने, दिलीप साळुंखे, सुभाष थोरात, कृष्णकुमार सोडारी, दीपक ताशांबर, लक्ष्मण तनपुरे, संतोष जाधव, हनुमंत पवार, विजय शिंदे, रमेश डांगरे, रमेश यादव, कुलदीप तिवारी, शाखाप्रमुख पंढरीनाथ साळुंखे, संजय जाधव, अशोक लादे, शिवाजी लाड, ज्ञानदेव गुरव, संभाजी कुऱ्हाडे, दीपक निकम, सुरेश मोरे, पांडुरंग कदम भारत अवताडे, गणेश खरात, आयटी सेल युवा सेनेचे ॲडव्होकेट शैलेश कदम अल्पसंख्यांक शाखा संघटक दिलावर खान, आदिसह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

"माझा प्रभाग, माझा विभाग, माझी जबाबदारी...!" या घोषवाक्याप्रमाणे नागरिकांची सेवा हीच आमची प्राथमिकता असल्याचे सांगून शिवसेनेच्या या उपक्रमांमुळे नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले. स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी सतत जनतेच्या समस्यांसाठी काम करत आहेत. या शिबिरामुळे नागरिकांना लेणार त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

# एसी लोकलचा बनावट पास बनविणाऱ्या दांम्पत्याला अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून रेल्वे पास बनविण्याचा प्रयत्न एका उच्चशिक्षित दाम्पत्याला चांगलाच महागात पडला आहे. तंत्रज्ञानाचच्या मदतीने बनावट एसी लोकल पास तयार करून प्रवास करणाऱ्या अंबरनाथमधील पती-पत्नीला कल्याण रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. कल्याण स्थानकातील एसी लोकलमधील तपासणीदरम्यान हि घटना समोर आली. एका महिला प्रवाशाला तिकीट तपासणीदरम्यान विशाल नवले नामक टीसीने पास दाखविण्यास सांगितले. तिने रेल्वेच्या यूटीएस ॲपमधील स्क्रीन दाखवली, मात्र तो पास संशयास्पद वाटल्याने टीसीने तत्काळ रेल्वे हेल्पलाईनवर कॉल करून त्या पासची पडताळणी केली. तपासात धक्कादायक बाब समोर आली पास ओम शर्मा या व्यक्तीचा असून, तो जानेवारी महिन्यात जारी केलेला आणि फेब्रुवारीमध्येच कालबाह्य झालेला होता. महिलेने स्वतःचे नाव गुडिया शर्मा असल्याचे सांगितल्याने टीसीचा संशय अधिक गडद झाला. डोंबिवली स्थानकात तिला उतरवून आरपीएफ कार्यालयात चौकशी करण्यात आली. तेव्हा खरा खुलासा झाला तिच्या पतीने स्वतःच्या एसी लोकल पासवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एडिट करून त्यावर पत्नीचे नाव व तपशील टाकत बनावट पास तयार केल्याचे मान्य केले. दोघांवर रेल्वे पोलीस स्थानकात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# संविधानिक मूल्य व तत्वे दैनंदिन आचरणात आणावीत

## - डॉ.श्रीमंत शिवाजी कोकाटे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : भारतातील प्राचीन परंपरा व युरोपातील विविध संविधानांशी तुलना करताना मुलींच्या जन्माचे स्वागत, वैज्ञानिक दृष्टीकोन, राईट टू एज्युकेशन, मूलभूत हक्क व कर्तव्ये, पर्यावरण संरक्षण, मातृभाषेची अस्मिता, बहुभाषिकता, विशेषाधिकार अशा अनेक महत्त्वाच्या पैलूंवर प्रभावी विचारमंथन भारतीय संविधानात केले आहे . तसेच आपले संविधान मानवतावादी व विज्ञानवादी आहे. एकमेकांच्या विचारांमध्ये मतभेद असणे चूक नाही, परंतु द्वेष मात्र नसावा. मतभेद असणे हेच समाजाच्या वैचारिक प्रगतीचे लक्षण आहे. असा मोलाचा संदेश ख्यातनाम वक्ते डॉ. श्रीमंत शिवाजी कोकाटे यांनी "संविधानाने आपल्याला काय दिले" या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण आणि माहितीपूर्ण मार्गदर्शन करताना सांगितले..

संविधान अमृत महोत्सव अंतर्गत "घर घर संविधान" या उपक्रमाच्या निमित्ताने उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाने व




शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांच्या संकल्पनेतून ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे वतीने दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी ठाणे मनपा शाळा क्रमांक 23 किसन नगर येथे मनपा कार्यक्षेत्रातील सर्व मनपा, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित आणि स्वयंअर्थ सहाय्यित शाळांतील मुख्याध्यापकांसाठी संविधानाने आपल्याला काय दिले या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी केले. यावेळी त्यांनी शाळा शाळांमधून विद्यार्थ्यांची म्हणजे या देशाच्या भावी आधारस्तंभ यांची जडणघडण होत असून ती संविधानिक तत्त्वानुसार करण्यात यावी व या संविधानाचा प्रचार प्रसार पालकांपर्यंत करण्यात यावा असे आवाहन केले. तसेच ठाणे मनपा शिक्षण उपायुक्त सचिन सांगळे यांनी संविधानाविषयी आपले विचार व्यक्त केले. यावेळी सर्व उपस्थित मुख्याध्यापक व मान्यवरांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले व उपस्थित मख्याध्यापकांना संविधान उद्देशिका प्रत वितरीत करण्यात आली. वक्त्यांचा परिचय शाळा क्र. २३ चे प्रभारी मुख्याध्यापक दीपक मोराणकर यांनी करून दिला.

सदर व्याख्यानास ठाणे मनपा कार्यक्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांतील एकूण 487 मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा पाटील, सीआरसी क्र. 10 यांनी केले. कार्यक्रमाची सांगता ठाणे मनपा गट अधिकारी संगीता बामणे यांनी आभार प्रदर्शनाने केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक कार्यक्रमाधिकारी श्री चेतन देवरे, यु आर सी समन्वयक श्री रवींद्र पाटील व मुश्ताक पठाण सर्व गटप्रमुख, सीआरसी यांनी परिश्रम घेतले.

पुढे बोलताना डॉ. श्रीमंत शिवाजी कोकाटे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, त्यामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी, संविधानाचे सर्वोच्च स्थान , तसेच मूलभूत हक्क, कर्तव्ये, स्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्याय व धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता या संविधानिक मूल्यांचे सोदाहरण स्पष्टीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी बोलताना त्यांचे वाचनप्रेम, लेखन, जातीनिर्मूलन, पत्रकारिता, कायदामंत्री, म्हणून केलेले कार्य आणि सामाजिक-शैक्षणिक अतुलनीय योगदान या मुद्दयांवर प्रकाश टाकला. यावेळी श्री कोकाटे यांनी उपस्थित श्रोत्यांना अक्षरशः खिळवून ठेवले होते अशा प्रतिक्रिया श्रोत्यांमधून आल्या.

# जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धा



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय मध्ये विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून दरवर्षीप्रमाणे दिनांक 27 नोव्हेंबर 2025 रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि भारतीय संस्कृती जोपासली जावी या उद्देशाने भारतीय सण व उत्सव या विषयावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता अकरावी बारावीच्या एकूण 30 विद्यार्थ्यांनी व समूहाने या रांगोळी स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. अतिशय आखीव रेखीव आणि आकर्षक रंग भरून विद्यार्थ्यांनी अनेक भारतीय सण उत्सवावर आधारित उत्कृष्ट रांगोळ्या काढल्या . तुळशी विवाह, नवरात्र उत्सव ,महाशिवरात्र, गणेशोत्सव ,रामनवमी ,मकर संक्रात, दिवाळी व बैल पोळा इत्यादी विषय या स्पर्धेत दिसून आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री रोहणे सर, शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .या स्पर्धेचे परीक्षण सौ रेश्मा तारमळे मॅडम व श्री उद्धव खोमणे सर यांनी केले. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन सौ चैताली टेंभे मॅडम यांनी उत्तम प्रकारे केले होते.

# बाल रंगभूमी मुंबई परिषद कल्याण शाखेचा जल्लोष महोत्सव



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : दि. 14 नोव्हेंबर रोजी बालकलाकारांच्या सादरीकरणाने कल्याण नगरीत रंगला बालाविष्कार. कल्याण - दि. 14 नोव्हेंबर 2025 रोजी बाल दिनाच्या आवश्यकते साधून बालरंगभूमी परिषदेच्या कल्याण शाखेने आयोजित केलेल्या जल्लोष लोककलेचा या महोत्सवाला बालकलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

बालकलाकारांनी एकल गायन,वादन,नृत्य तसेच कोरकू नृत्य,दिंडी नृत्य,गोंधळ, गणपती नृत्य असे विविध समूहनृत्य व समूहगान उत्तम वेशभूषा करून सादरीकरण करण्यात आले या महोत्सवात आपल्या ज.ए.इ.ची सी.एम. पुराणिक प्राथमिक शाळा सुभेदार वाडा कल्याण शाळेला समूहनृत्यात प्रशंसनीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षक विद्यार्थी,पालक यांचे सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

# कल्याणच्या सुभेदार वाडा शाळेत "संविधान दिन" साजरा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ज.ए.इ.ची सी.एम. पुराणिक प्राथमिक शाळा सुभेदार वाडा कल्याण या शाळेत "संविधान दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला ... *संविधान दिनानिम्मित शाळेत संविधान गीत,संविधान रॅली, घोषणा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत स्पर्धा,प्रश्नमंजुषा या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी सौ.कल्पना सं.पोतदार मॅडम यांनी भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आणि भारताचे संविधान या बद्दल अधिक माहिती मुलांना समजावून सांगितली तसेच आपले संविधान आपला अभिमान क.डों.म.पा.शिक्षण मंडळ कल्याण तर्फे सुरू असलेल्या उपक्रमाबद्दल पुन्हा माहिती दिली. उद्देशिका सर्व वर्गावर्गात मुलांनी म्हटली.

# 'टोरेंट'च्या शिबिराला प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी**: टोरंट पॉवर व महावितरणच्या संयुक्त ग्राहक सेवा शिबिरात नागरिकांनी विविध समस्या मांडल्या. हे शिबिर कंपनीच्या चाविन्द्रा येथील अर्थ कार्यालयात झाले. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शीळ येथील अरिहंत कार्यालयातही आयोजित केलेल्या ग्राहक सेवा शिबिराला नागरिकांनी प्रतिसाद दिला. दोन्ही ठिकाणी ७०० हून अधिक ग्राहकांनी समस्या मांडल्या.

# मुरबाडमध्ये आदिवासी एकता परिषदेकडून संविधान सन्मान दिन साजरा!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : आदिवासी एकता परिषद ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा आदिवासी नेते राजाभाऊ सरनोबत यांच्या वतिने 26 नोव्हेंबर संविधान दिनाचे औचित्य साधून आदिवासी आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे व भगवान बिरसा मुंडा यांची सयुंक्त जयंती साजरी करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा व राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तद्नंतर या कार्यक्रमासाठी निमंत्रित शिवसेना उबाठा पक्षाचे ठाणे जिल्हा ग्रामीण प्रमुख अल्पेश भोईर, उपजिल्हा



प्रमुख आप्पा घुडे, तालुका अध्यक्ष संतोष विशे यांच्या हस्ते सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्यांचा संविधान सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कारांर्थी मध्ये सामाजिक कार्यकर्ते भगवान पवार, दिलीप धनगर,मुख्याध्यापक श्री गवारी सर, शिक्षक भालचंद्र गोडांबे, पत्रकार संजय बोरगे, शंकर करडे, दिलीप पवार, सचिन पोतदार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तर यावेळी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्या बद्दल अल्पेश भोईर यांनी आयोजक राजाभाऊ सरनोबत करत असलेल्या आदिवासी बांधिलकीचे कौतुक करत भगवान बिरसा मुंडा व राघोजी भांगरे यांच्या इतिहासावर प्रकाश टाकला. तसेच आप्पा घुडे व संतोष विशे यांनीही शुभेच्छा दिल्या. तर यावेळी युवा सेना तालुका अध्यक्ष राहूल शिंदे, लोकक्रांती सामाजिक संघटनेचे प्रा. नरेश मोरे, मंगेश भुसारी, अल्पाश बेग,अशोक भोईर उपस्थित होते.

# प्रविण पाटील नगरसेवक होणार

## तरूण वृद्ध व महिलांचा पाठिंबा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण नगरपालिका प्रभाग क्रमांक २ चा साधेपणाचा आणि सेवाभावाचा प्रामाणिक चेहरा म्हणून ओळखले जाणारे स्वच्छ प्रतिमा असलेले लोकप्रियतेचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रविण शंकर पाटील

गेल्या नऊ वर्षांपासून प्रभाग क्र. २ मध्ये प्रामाणिकपणे सेवा देणारे प्रवीण शंकर पाटील हे साधेपणा, माणुसकी आणि लोकाभिमुख वृत्तीचे उत्तम उदाहरण आहेत.शहरातून चालत जात असताना अथवा दुचाकीवरून जाताना ते प्रत्येकाला हाक मारत जातात. गावातील लग्न, जन्म, मृत्यू किंवा दवाखान्यातील प्रसंग असो ते स्वतः हजर राहून धीर देऊन मदत करतात आणि साथ देतात.

एक उच्च शिक्षित तरुण आणि उमदे व्यक्तीमत्व असलेले इंजिनिअर प्रविण पाटील यांना कधीच कसलाही गर्व नाही; निर्व्यसनी, निरागस, शांत



आणि मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वांच्या मनात घर करून आहेत. वृद्ध व्यक्तींना वाकून नमस्कार करण्याचे संस्काराचे बालकडू घरातून मिळाल्यामुळे व धार्मिक वृत्ती स्वतःमध्ये कायम जपलेली आहे. असे दांडगा जनसंपर्क, सर्वांना जोडून घेण्याची वृत्ती आणि सतत मदतीसाठी तयार असलेले त्यांचे हसतमुख व्यक्तिमत्त्व यामुळे प्रवीण शंकर पाटील हे नाव प्रभागातील विश्वास, साधेपणा आणि सेवाभावाचे प्रतीक बनले आहे.असे हे व्यक्तिमत्व पेण नगर परिषदेत जनसेवक म्हणून उदयास येतील यात तीळमात्र शंका नाही.

प्रवीण पाटील यांनी आपल्या प्रभागात प्रचारात घेतलेली आघाडी पाहता जोरदार मुसंडी मारली असल्याने विजय निश्चित मानला जात असल्याच्या प्रतिक्रिया तरूण वृद्ध व महिला भगिनींनी सांगितले तसेच आमच्या हक्काचा नगरसेवक प्रवीण पाटील पेण नगरपालिका निवडणुकीत विजयी होणार असेही नागरिक व मतदारांनी सांगितले.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार-२३४

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अनु. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | ओनर मे. गोदरेज प्रॉपर्टीज तर्फे श्री. मनिष वर्मा | स.नं. ५२, हि.नं. १, स.नं. ५४ बी, हि.नं. १, २ व ३ मौजे-वडवली, ता. कल्याण | ३५ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास; त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसांच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल; याची नोंद घ्यावी.

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/७२१**
**दिनांक :- २८/११/२०२५**

**सही /-**
**(संजय जाधव)**
**वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# उल्हासनगर मनपाची श्वान निर्बिजीकरण मोहीम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेचे भटके श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम राबविणे संदर्भात स्वताःचे पथक अथवा यंत्रणा नाही व पशु वैद्यकीय अधिकारी हे पद आस्थापनावर मंजुर नाही. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये भटके श्वानांच्या संख्या नियंत्रणात आणणेसाठी भटके श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम राबविणे संदर्भात जाहीर ई-निविदा प्रक्रिया करण्यात येते. सदर भटके श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत



अद्यावत निर्बिजीकरण केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. सन २०२५-२०२६ या अर्थिक वर्षामध्ये ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेअर ॲन्ड रुलर डेव्हलपमेंट, हैदराबाद या संस्थेची भटके श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण कामकाजाकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त संस्था ही स्वतःच्या वाहनाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील भटके कुत्रे त्यांचे स्वतःचे पथकामार्फत पकडून निर्बिजीकरण केंद्रावर घेवुन जातात व निर्बिजीकरण शस्त्रिक्रिया झाल्यावर पुन्हा त्याच ठिकाणी सोडण्याचे काम करतात व निर्बिजीकरण शस्त्रक्रिया केलेल्या भटके कुत्र्यांच्या कानावर "व्ही" मार्क (ब्रेडींग) करण्यात येते. (शस्त्रक्रिया झाल्याचे ओळख चिन्ह करणे) सदर भटके कुत्र्यांना निर्बिजीकरण शस्त्रक्रिये नंतर रेबीज प्रतिबंधात्मक लस देण्यात येते व आवश्यक खाद्य ३ ते ५ दिवसांकरिता देण्यात येते.तरी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटके श्वान यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण संदर्भात ८४५९८७७३५७ या हेल्प लाईनवर संपर्क करण्यात झावा.

# 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या' मुल्यमापन समितीच्या सदस्य पदी पत्रकार संजय कांबळे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे निर्देशानुसार ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान आहे. यामध्ये काम करणाऱ्या ग्रामपंचायती,पंचायत समिती, व जिल्हा परिषदासाठी सन२०२५'२६या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग, व राज्य अशा चार स्तरावर प्रोत्साहन देण्याकरिता'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, सुरू करण्यात आले असून यातील तालुकास्तरीय मुल्यमापन समितीच्या सदस्य पदी कल्याण तालुक्यातील जेष्ठ पत्रकार संजय जयवंत कांबळे यांची निवड करण्यात आली असून त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. शासनाच्या विविध योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविल्या जातात. याचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविणे, लोकांचे जीवनमान उंचावणे,ग्रामपंचायतीच्या लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, नागरिकांना सुलभरितीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेत सहभाग घेणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय, या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्यात आले आहे. या मुल्यमापन समितीचे



अध्यक्ष गटविकास अधिकारी असून सदस्य म्हणून महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, उप अभियंता(बांधकाम) उप अभियंता(पाणी पुरवठा)उप अभियंता(लघुपाटबंधारे)विस्तार अधिकारी, या समितीमध्ये असून अंत्यत महत्त्वाच्या अशा शासनाच्या या समितीवर पत्रकार संजय कांबळे यांची नियुक्ती करण्यात आल्याने ठाणे जिल्हा परिषदेचे वरीष्ठ अधिकारी, तत्कालीन गटविकास अधिकारी संजय भोये, सध्याचे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी,तत्कालीन तहसीलदार सचिन शेजाळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ आशा मुंजाळ, दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ पूनम जयकर, आरोग्य कर्मचारी,सामाजिक कार्यकर्ते किरन केणे, महेश देशमुख,संजय घारे, म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच निलिमा म्हात्रे,इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024